# मुंबईत 'रिअल इस्टेट स्टीअरिंग कमिटी'

## बांधकाम आरखड्यांच्या मंजुरी प्रक्रियेत एआयचा वापर

▶ मुंबई, नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बृहन्मुंबई महानगरपालिकेचे आयुक्त भूषण गगराणी यांनी 'रिअल इस्टेट स्टीअरिंग कमिटी' स्थापन करण्यास मान्यता दिली आहे. या समितीत क्रेडाई-एमसीएचआय, नरेडको महाराष्ट्र, प्रॅक्टीसिंग इंजिनिअर्स, आर्किटेक्टस अँण्ड टाऊन प्लॅनर्स असोसिएशन (पीईएटीए) आणि बृहन्मुंबई डेव्हलपर्स असोसिएशन (बीडीए) या संस्थांचे प्रतिनिधी तसेच महापालिकेच्या विविध विभागांतील अधिकारी, अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांचा सहभाग असणार आहे.

रिअल इस्टेट स्टीयरिंग कमिटी स्थापन झाल्यावर या समितीद्वारे बीएमसी ईओडीबी २.० (ईझ ऑफ डुईंग बिझनेस २) सुरू करणार असून, बांधकाम आराखड्यांच्या मंजुरी प्रक्रियेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा (एआय) समावेश करण्याचे काम सुरू आहे. या समितीद्वारे शहरातील रिअल इस्टेट क्षेत्रासमोरील विविध अडचणींवर विकासक संघटनांकडून आणि महापालिका अधिकाऱ्यांकडून मते मागवली जाणार आहे. आणि त्या मुद्द्यांवर चर्चा करून तत्काळ तोडगा काढण्याचा प्रयत्न केला जाणार आहे.

### पंधरवड्याने होणाऱ्या बैठकीत अडचणींवर चर्चा

मुंबईतील महानगरपालिकेच्या प्रशासन आणि रिअल इस्टेट उद्योग यांच्यातील सहकार्य अधिक बळकट करण्यासाठी ही घोषणा एक महत्त्वपूर्ण पाऊल मानली जात आहे. या समितीची पंधरवड्याने बैठक घेण्यात येईल, ज्यात रिअल इस्टेट क्षेत्राशी संबंधित महत्त्वाचे धोरणात्मक प्रश्न, संधी आणि अडचणी यावर चर्चा केली जाईल. या बैठकीचे अध्यक्षपद महापालिका आयुक्त कार्यालयातील उपमुख्य अभियंता चंद्रशेखर उंडगे तसेच महापालिका आयुक्त स्वतः भूषण गगराणी यांच्याकडे असणार आहे.

### आता प्रीमियम पेमेंटच्या वेळापत्रकाचे सुलभीकरण

प्रीमियम पेमेंटच्या वेळापत्रकाचे सुलभीकरण करून ते १०:१०:८० या रचनेनुसार करण्यात येणार आहे. यामध्ये मंजुरीच्या वेळी दहा टक्के, कमेन्समेंट सर्टिफिकेट मिळाल्यावर आणखी दहा टक्के, आणि उर्वरित ऐंशी टक्के ऑक्युपेशन सर्टिफिकेट (ओसी) टप्प्यावर भरणे ही होती. सध्या विकासकांना फंजिबल एफएसआर, ओपन स्पेस डिफिशियन्सी, फायर सर्व्हिस चार्जेस, स्क्रूटिनी फी आणि डेव्हलपमेंट सेस अशा विविध प्रीमियम्सची रक्कम आधीच भरण्याची आवश्यकता असते.

आयुक्त गगराणी यांनी ही माहिती क्रेडाई-एमसीएचआय, नरेडको महाराष्ट्र, बीडीए आणि प्रॅक्टिसिंग इंजिनिअर्स, आर्किटेक्ट्स पीईएटीए या संस्थांच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांसह मुख्यालयात झालेल्या बैठकीत दिली.